जा.क्र.औद्यो/१६-सआ/शेळी मेंढी/कुक्कूट/३६
वराह पालन सह. संस्था/नोंदणी निकष/२०१७
सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
दिनांक २६/१२/२०१७

## -: परिपत्रक - :

**विषय:- शेळी मेंढी पालन सहकारी संस्था, कुक्कूट पालन सहकारी संस्था, व वराह पालन सहकारी संस्था या संस्थांचे नोंदणी निकषाबबाबत.**

उपरोक्त विषयांकित सहकारी संस्थांसाठीचे नोंदणीचे अनुषंगाने सन १९८९ मध्ये निकष ठरविणेत आलेले आहेत. सदर संस्थांचे नोदणीचे निकष नव्याने तयार करणे आवश्यक असलेने सुधारित निकष खालील प्रमाणे ठरविण्यात येत आहेत.

**शेळी मेंढी पालन सहकारी संस्था :-**

१. संस्थेचे कार्यक्षेत्र ५ कि.मी. परिसरातील गावांपुरते मर्यादित असावे. शक्यतो एका गावात एकच संस्था असावी. बंदीस्त शेळी पालन संस्थेबाबत प्रकल्प अहवालात नमूद असलेल्या संस्थांच्याबाबत एका गावात एकापेक्षा अधिक शेळी पालन संस्था नोंदविता येतील.

२. नोदणीच्या वेळेस सभासदांची संख्या किमान २१ असावी.

३. नोंदणीच्या वेळेस प्रत्येक प्रवर्तक सभासद प्रवेश फी रू.१००/- व भागाची रक्कम रू.५००/- असावे. असे एकूण भागभांडवल रू १२६००/- असावे.

४. संस्थेच्या कार्यक्षेत्रात पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध असल्याबाबत प्रमाणपत्र पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करून सादर करणे आवश्यक आहे.

५. पशुखाद्य व वनचराईची उपलब्धता असल्याबाबत कामगार तलाठी यांच्याकडून प्रमाणपत्र उपलब्ध करून सादर करावे.

६. नियोजित संस्था तांत्रिक दृष्टया जीवनक्षम होईल याबाबत पशुसंवर्धन खात्याची मान्यता असावी. तसेच विक्री व्यवस्थेची सोय असावी.

**कुक्कूट पालन सहकारी संस्था :-**

१. संस्थेचे कार्यक्षेत्र महसुली गावापुरते मर्यादित असावे.

२. नोंदणीच्यावेळेस प्रवर्तक सभासदांची संख्या किमान २१ असावी.

३. नोंदणीच्या वेळेस प्रत्येक प्रवर्तक सभासद प्रवेश फी रू.१००/- व भागाची रक्कम रू.५००/- असावे असे एकूण भागभांडवल रू.१२६००/- असावे.

४. संस्थेच्या कार्यक्षेत्रात पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध असल्याबाबत प्रमाणपत्र पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करून सादर करणे आवश्यक आहे.

५. शासकीय कुक्कुटपालन केंद्रातून अगर खाजगी क्षेत्रातून एक दिवसांचे पक्षी उपलब्ध करून घेणेची सोय जवळपास उपलब्ध असावी.

६. पक्षांना पिंजरे खरेदी करून पाण्याची व खाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

७. पक्षांना कोंबडी खाद्य उपब्धता होणे आवश्यक आहे.

८. पशुसंवर्धन खात्याकडून संस्था नोंदविण्यात काही हरकत नाही असा दाखला घेणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्प आर्थिक व तांत्रिकदृष्टया सक्षम असलेबाबत त्यांचे प्रमाणपत्र असावे.

९. ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१०. प्रवर्तक सभासद प्रशिक्षित असल्याबाबतचा सोबत दाखला जोडणे आवश्यक आहे.

११. रू.१००/- चा स्टॅम्प पेपरवर जागेबाबत प्रतिज्ञा पत्र व जागेचा ७/१२ उतारा आवश्यक आहे.

**<u>वराह पालन सहकारी संस्था :-</u>**

१. संस्थेचे कार्यक्षेत्र ५ कि.मी. परिसरातील गावांपुरते मर्यादित राहील.
२. नोंदणीच्या वेळेस प्रवर्तक सभासदांची संख्या किमान ११ असावी.
३. नोंदणीच्या वेळेस प्रत्येक प्रवर्तक सभासद प्रवेश फि रू.१००/- व भागाची रक्कम रू.५००/- असावे. असे एकूण भागभांडवल रू.१२६००/- असावे.
४. संस्थेच्या कार्यक्षेत्रात पशुवैद्यकिय सेवा उपलब्ध असल्याबाबत प्रमाणपत्र पशुवैद्यकिय अधिकारी यांचेकडून प्राप्त करून सादर करणे आवश्यक आह.
५. शासकीय युनिटमधून अथवा खाजगीरित्या वराह यांची उपलब्धता असणे आवश्यक आहे.
६. वराहांसाठी वाजवी किंमतीत खाद्य उपलब्ध असणे जरूरीचे आहे.

७. ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र सोबत असावे.

८. विक्रीस योग्य वराह विक्रीची व्यवस्था उपलब्ध असली पाहीजे.
९. वराह पालनासाठी इमारत बांधणी इतर आवश्यक बाबींसाठी निधी उपलब्धतेची सोय कशी करणार याबाबत स्पष्टीकरण प्रस्तावासोबत असावे.
१०. पुशसंवर्धन खात्याकडून वराह पालन प्रकल्प तयार करून प्रकल्प आर्थिक व तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत प्रमाणीत केले पाहीजे.
११. पशुसंवर्धन खाते किंवा संबंधीत खात्याकडून अर्थसहाय्याची आवश्यकता असल्यास प्रकल्पास खात्याची नोंदणीपुर्व मान्यता घेणे आवश्यक आहे.

तावरे
नुली
16/12/17 - स.नि. (१६-८ला) अपर निबंधक (कर्मला)

O/c
(डॉ.विजय ना.झाडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
5/2012

१३४८
२०१२/२०९६